# महासुरक्षा पत्रिका

## राष्ट्रीय सुरक्षा परिषद

महाराष्ट्र चॅप्टर

NATIONAL SAFETY COUNCIL

MAHARASHTRA CHAPTER

मुखपत्र




संपादक
श्री. द. ल. मस्कीकर

वर्ष १ ले अंक ४ था | एप्रिल - जून २००९ | सभासदांसाठी विनामूल्य


## अध्यक्षांचे मनोगत



मित्रांनो,

हवा, पाणी व जमीन या मुलभूत व जीवनावश्यक गोष्टींची देणगी निसर्गाने मानवाला दिली. परंतु या अमुल्य देणगीचा त्याने बेदरकार विकास, चैन व सुख लोलुपता यांच्या हव्यासापायी बेजाबदारपणे वापर केला व गंभीर पर्यावरणीय समस्या निर्माण केल्या आहेत. या समस्यांमुळे मानवाला अनेक शारिरीक व मानसिक आजारांना तोंड द्यावे लागत आहे, वीज निर्मिती घटत आहे, शेती उत्पादन घटत आहे, ४०० पेक्षा अधिक दुर्मिळ वनस्पतींच्या प्रजाती नष्ट होत आहेत, संधिवात, कर्करोग, मधुमेह, हृदयविकार या व्याधींनी ग्रस्त झालेल्यांचे प्रमाण वाढत आहे.

कोठलीही आर्थिक व राजकीय प्रणाली अंगिकृत केलेले राष्ट्र असो, समाजवादी, साम्यवादी, भांडवलशाहीवादी वा मिश्र अर्थव्यवस्था स्विकारलेले देश असोत, या सर्व राष्ट्रांनी आपल्या विकासाचा पाया हा पाश्चिमात्य विकास पध्दती वरच ठेवला आहे आणि त्या विकास पध्दतीत तर ऊर्जा, भांडवल, नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा प्रचंड वापर करावा लागतो. या सर्व उपद्व्यापातून खूप मोठ्या प्रमाणावर सांडपाणी, घनकचरा, रासायनिक कचरा, किरणोत्सारी कचरा ह्या गोष्टी निर्माण होतात आणि यामुळे वाढते प्रदुषण, अनारोग्य व नैसर्गिक साधनसंपत्तीची हानी या समस्या निर्माण झाल्या आहेत व होत आहेत. ह्या समस्यांचे निराकरण करणे ही केवळ शासनाची नव्हे तर तुमची, माझी, समाजाच्या सर्व घटकांची जबाबदारी आहे. यासाठी आपल्याला योग्य ती स्वयंशिस्त लावावी लागेल. कुठे लाऊया ही स्वयंशिस्त ? तर इथे व अशी:-

१) भरमसाठ उत्पादन वाढीसाठी निसर्गाचा समतोल ढळविणाऱ्या प्रक्रीयांचा वापर करायचा नाही.
२) सुख, चैन व प्रतिष्ठेचा देखावा यासाठी विविध मोटार गाड्यांचा व त्या भरमसाठ वेगाने चालविण्याचा मोह टाळायचा आहे.
३) नविन आयात-धोरणाचा बुरखा पांघरुण दुय्यम दर्जाच्या विदेशी सेकंड हँड मोटार गाड्यांची आयात टाळायची आहे.
४) जागरुकता, जिद्द व जबाबदारपणा यांच्या बळावर आपल्या पर्यावरणाचा ऱ्हास थांबवायाचा आहे.
५) पर्यावरणाची स्वच्छता व त्याचे संवर्धन ही आपली सर्वांची सामुहीक, सार्वजनिक आणि राष्ट्रीय जबाबदारी आहे या निश्चयाने कामाला लागायचे आहे.

५ जूनच्या जागतिक पर्यावरणाच्या दिवशी आपण वर उल्लेखलेले निश्चय तर करायचेच, परंतु या निश्चयांची आठवण व सक्रीय अंमलबजावणी मात्र नियमित व नित्य-नेमाची ठेवायची आहे. म्हणून... **"रोजच पाळायचा आहे पाच जून, कारण बरेच करायचे आहे अजून"**, ह्या घोषणेने कामाला लागू या!

**अरविंद रा. दोषी**
अध्यक्ष

## "मी सुरक्षित"

"सुरक्षा नसे कोणा एकाची जवाबदारी, अपघात टाळण्यासाठी घ्यावी प्रत्येकाने खबरदारी" अशा प्रकारची वाक्यं आपण दररोज वाचतो किंवा "आज के दिन मैं ये सत्यनिष्ठापूर्वक प्रतिज्ञा करता हूँ, के सुरक्षा, स्वाथ्य तथा पर्यावरण के प्रती मैं अपने आप को समर्पित करता हूँ" अशा प्रकारची शपथ आपण दर वर्षी चार मार्चला घेतो. त्यावेळी आपण हेही ठरवितो की आपण यापुढे सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करायचे व सुरक्षेच्या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायचे पण दुसरा दिवस उजाडला कि आपण हे सोयीस्कर रित्या विसरून जातो, नवीन वर्षाच्या संकल्पांप्रमाणे.

आपण असे जाणूनबुजून करतो का मित्रांनो ? नाही, आपल्याला अपघाताच्या तीव्रतेची कल्पना नसते. अपघाताची तीव्रता किती भयंकर असते याची आपल्याला जाणीव नसते. अपघाताची एक सुंदर व्याख्या आहे "अपघात म्हणजे एक दु:ख, एक होरपळ, एक विदारक अनुभव, जीवनस्तर उंचावण्याच्या प्रयत्नांतील एक अविभाज्य पण तितकेच अपरिहार्य नसणारे अंग म्हणजेच अपघात".

काही काही अपघात असे भयंकर असतात कि मती गुंग होऊन जाते. मेंदु काम करेनासा होतो. म्हणून मी आज तुम्हांला सुरक्षेचे महत्व सांगणार नाही मी फक्त तुम्हांला आज एक उदाहरण सांगणार आहे. "गुजरात मध्ये काही दिवसांपूर्वीच घडलेली घटना आहे दोन कामगार रसायनांच्या पाईपरॅकनर वेल्डींगचे काम करत होते, परमीट घेतले होते, पाईपलाईन आयसोलेट केली होती, सेफ्टी बेल्ट लावलेला होता.

नेहमी वेल्डींग करते वेळी वेल्डर पाईपलाईनला होल्डरचा स्पर्श करुन करंट बरोबर आहे कि नाही ते तपासतो यावेळी त्या वेल्डरनी चुकून पाईपलाईनच्या जवळून जाणाऱ्या स्टिम लाईनला होल्डरने स्पर्श केला दुर्दैवाने त्या स्टीम लाईनमध्ये जवळ जवळ १५ कि ग्र प्रेशर होते ज्यामुळे लाईन ब्लास्ट झाली आणि दोघेही जागीच ठार झाले".

मला सांगा त्यांनी परमीट घेतले होते, सुरक्षा साधनांचा वापर केला होता तर मग अपघात का झाला ?

मित्रांनो, स्वत:ची जवाबदारी टाळण्याच्या प्रयत्नांतच खूप वेळा आपण अपघाताला कारणीभूत ठरतो म्हणूनच सुरक्षेचे नियम, वैयक्तिक सुरक्षा साधने याच प्रमाणे जवाबदारीने काम करणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे.

खरं म्हणजे सुरक्षेची सुरुवात होते ती स्वत:पासूनच आपण स्वत: सुरक्षित राहिलो तर आपला कारखाना सुरक्षित राहिल. जर आपला कारखाना सुरक्षित राहिला तर आपले राज्य व पर्यायाने देश सुरक्षित राहिल याची जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे.

चला तर मग सर्वांनी मिळून सुरक्षेच्या जवाबदारीने काम करुया व "मी सुरक्षित" चा मंत्र प्रत्येकापर्यंत पोहोचवूया.

**प्रशांत संसारे**
व्यवस्थापक (सुरक्षा, अरोग्य व पर्यावरण विभाग)
के व्हाले रेझिन्स इं. प्रा. लि.

# औद्योगिक सुरक्षा : एक उपेक्षित वाटचाल.....contd

राजेंद्र पायनाईक
टेक्नोवा इमेजिंग सिस्टम्स (प्रा.) लि.

सुरक्षा धोरण राबविण्यासाठी कामगार, व्यवस्थापन, पर्यवेक्षक व सुरक्षा अधिकारी यांचा सारखा सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक कामाची सुरक्षित आखणी, सुरक्षा समितीची धोकादयक घटनांची व अपघातांची कारणमीमांसा (ॲक्सिडेंट इन्वेस्टिगेशन) व त्याच प्रकारचे अपघात टाळण्यासाठी घेतलेले निर्णय, कामगारांच्या आरोग्य चिकित्सा, कारखाण्याच्या आवारात प्रवेणश करणाऱ्या ठेकेदारांची सुरक्षेची जबाबदारी व त्यासाठी घेतलेले निर्णय, वातावरणाचा समतोल राखण्यासाठी केलेली व्यवस्था, गृहव्यवस्था, सुरक्षा साधनांचा उपयोग, कार्य अनुमती क्रार्यक्रम, आणिबाणीच्या प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता इ. या सर्व गोष्टी पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापन वचनबध्द असते.

**सुरक्षा समिती**

सुरक्षेबाबत कामगारांच्या सतत संपर्कात राहण्यासाठी सुरक्षा समितीचा उपयोग होतो. सुरक्षा समितीमध्ये सुरक्षा अधिकारी, खात्याचे व्यवस्थापक, पर्यवेक्षक, डॉक्टर व कामगारांचे प्रातिनिधी यांचा समावेश असतो. सुरक्षा समितीच्या सभेमध्ये असुरक्षित स्थिती व असुरक्षित कृतीवर विचार विनिमय केला जातो. तसेच प्रत्येक असुरक्षित स्थितीवर एकत्रित तोडगा काढला जातो. लहान-सहान अपघात, धोकादायक घटना, अपघाताचा तपशिल, सुरक्षिततेची संकल्पना व सुरक्षानिती कशा प्रकारे सर्व थरातील कामगारांमध्ये राबवता येईल याचा विचार केला जातो. या सभेत कामगारांचा चांगला सहभाग मिळू शकतो.

सुरक्षिततेचा प्रसार करणे, शिक्षण देणे, सुरक्षा चित्र व घोषवाक्य स्पर्धा आयोजित करणे, अपघात होऊ नये म्हणून नवीन योजनांचा समावेश करुन त्यात कामगारांना सहभागी करणं, सुरक्षा विषयक प्रसार करणे, विविध स्पर्धा आयोजित करुन सर्व कामगारांचा समावेश करणे, प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेऊन कामगारांचे ज्ञान वाढविणे, या गोष्टींचा विचार करून त्या कितपत तीव्र करता येतील याबाबत संयुक्त विचार विनिमय सुरक्षा समितीच्या सभेमध्ये होत असतो.

**सुरक्षा अधिकारी**

एखाद्या कारखान्यामध्ये एक हजार पेक्षा जास्त कामगार असतील किंवा एखाद्या कारखान्यामध्ये कमी कामगार असतील पण धोकादायक काम चालत असेल तर अशा कारखान्याध्ये सुरक्षा अधिकारी नेमणे आवश्यक असते. परंतु ज्या कारखान्यामध्ये कमी कामगार असतात तेथे सुरक्षा अधिकारी नेमला जात नाही तर सुरक्षेचा सर्व भार कंपनीच्या पर्सनेल खात्याकडे सोपविला जातो. येथे एखादा अपघात झाला व एखादा कामगार जखमी झाला तर त्याला हॉस्पिटलमध्ये पाठवून त्याच्यावर ईलाज केला जातो. आपघाताची कारणमीमांसा होते व सदर अपघात होऊ नये म्हणून योजना आखल्या जातात. यापलीकडे काहीही होत नाही याचे दुष्परिणाम पुढे कामगार, सुरक्षा अधिकारी व व्यवस्थापनाला भोगावे लागतात. कारण जेव्हा अशा कारखान्यांमध्ये सुरक्षा अधिकाऱ्यांची नव्याने नेमणूक होते तेव्हा प्रथमच सुरक्षा नियम आचारणात आणणे कठीण होते म्हणून एखादा प्रकल्प व्यवस्थापन हातात घेते व नवनवीन अभियंते निवडते त्याचबरोबर एखादा सुरक्षा अधिकारी देखील नेमणे जरुरीचे आहे. जेणे करुन सुरुवातीपासून सुरक्षेचे बीज कामगारांमध्ये पेरता येईल. सुरक्षा नियम सुरुवातीपासूनच त्यांच्या अंगवळणी पडतील व त्यामुळे प्रथम सुरक्षा संस्कृती कामगारांत रुजेल.

आपल्या इथे बरेच छोटे-छोटे कारखाने आहेत जिथे कामगारांना सुरक्षा म्हणजे काय हे देखील माहीती नाही. अशा छोट्या कारखान्यांमध्ये कामगाराला मार लागला की सरकारी दवाखाण्यामध्ये पाठविले जाते व तिथेच त्याचा प्रश्न संपतो. खरतर अशा छोट्या कारखान्यांतील व्यवस्थापनांनी एकत्रीत येऊन एक सुरक्षा अधिकारी नेमला पाहिजे व एकत्रित सुरक्षा सुविधा राबविल्या पाहिजेत. जेणेकरून जेथे देखील सुरक्षेचे वातावरण निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण कमी होईल.

**सुरक्षा शिक्षण**

सुरक्षेच्या संदर्भात शिक्षण सर्व थरातील कामगारांना देणे आवश्यक आहे. व्यवस्थापन, पर्यवेक्षक व कामगार यांचा यात सहभाग असावा. यात अपघात कसे होतात अपघाताला केवळ कामगारच टाळू शकतील याचे महत्व कामगारांना समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी एखाद्या दुर्घटनेचे उदाहरण घ्यावे व त्यावर कामगारांशी सल्ला मसलत करावी व त्यांना यात जेवढे सहभागी करून घेता येईल तेवढे घ्यावे जेणेकरुन सुरक्षेबाबत त्यांचा दृष्टकोन बदलला पाहिजे. हे शिक्षण देताना एकप्रकारचे काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या कामाबद्दल शिक्षण दिले पाहिजे तरच त्यांचा सहभाग वाढेल. सुरक्षा शिक्षण ठराविक विषयाला अनुसरुन असावे, ते छोटे असावे पण सकस असावे. यावर अजून एक उपाय म्हणजे कामगारांना त्यांच्या कामाबद्दल त्यांच्या काम करण्याच्या ठिकाणी जाऊन माहीती देणे (ऑन दि जॉब ट्रेनींग), त्यातील संभाव्य धोके व ते टाळण्यासाठी करावयाचे उपाय पटवून देणे. या शिक्षणाला आज बरेच महत्व आले आहे. काही कामगार नेहमी एकाच प्रकारचे काम करीत असतील तर त्यांच्या काम करण्याच्या ठिकाणी सुरक्षा कशी राबवता येईल ते आपण त्यांना त्यांच्या भाषेत सहजा-सहजी समजवू शकतो. उदा. केवळ ग्राईंडींगचे काम करतांना एक विशिष्ट प्रकारचा ग्राईंडींग चष्मा वापरणे, हातमोजे वापरणे, ग्राईंडींग मशीनच्या चाकाचे परिक्षण करावे. आगिचा धोका टाळण्यासाठी आजुबाजुची गृहव्यवस्था नीट आहे किंवा नाही ते पाहणे, ग्राईंडिंगसाठी लागणाऱ्या वस्तुंची हाताळणी (मटेरीयल हॅडलींग) कशी करावी. थोडी फार इजा झाली तर प्रथमोपचार कसा करावा. अशी माहीती थोडक्यात व स्पष्टपणे कामागारांना देता येते.

**कार्य अनुमती पत्र**

कार्य अनुमती पत्रामध्ये काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण केल्यानंतर कामाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन कशा प्रकारे करावे हे नमूद कलेले असते. कार्य अनुमती पत्रामुळे सुरक्षित काम करण्याची हमखास खात्री असते.

उदा. १) एखाद्या पाइपलाईन, टाकी किंवा खड्डयात प्रवेश करावयाचा असेल व अशा ठिकाणी विषारी वायू, वाफ, धुळ असण्याची शक्यता असेल, ज्याचा माणसाच्या शरीरावर परीणाम होऊ शकतो अशा ठिकाणी प्रवेश करण्यापूर्वी खालील गोष्टींची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

(अ) टाकी, पाईप लाईन, किंवा खड्ड्यातील विषारी वायू किंवा गॅस पुर्णपणे काढून टाकण्याची योजना केली आहे.

(ब) टाकीत किंवा खड्ड्यांमध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तीने दूषीत हवामानापासून बचाव करणारी श्वासोच्छवासाची साधने (ब्रिदींग ॲपरेटस) व सुरक्षा पट्टा परीधान केला आहे.

(क) सदर सुरक्षा पट्टा दोरीला बांधला आहे व ही दोरी पकडण्यासाठी एका माणसाची व्यवस्था केली आहे.

(ड) टाकीची किंवा खड्ड्यांची पूर्ण तपासणी सक्षम अधिकाऱ्याने केलेली असावी. व त्याने टाकीत प्रवेश करण्याची परवानगी दिलेली असावी.

**अपघाताचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम**

एखाद्या कामगाराला मार लागला की त्याला कारखान्यातील दवाखान्यात प्रथमोपचार केले जातात व त्याला एखाद्या ठरलेल्या हॉस्पीटलमध्ये पाठवितात, कामगार किती दिवस घरी राहतो यावर त्याचे नुकसान अवलंबून असते. कंपनीच्या नियमानुसार त्याला जी मदत हवी असते ती विम्याचे पैसे मिळाले की त्यापलिकडे आपण काही विचार करीत नाही. परंतु एखाद्या व्यक्तीला मार लागल्यानंतर जखमी व्यक्ती, त्याच्या बरोबर काम करणारे त्याचे स्नेही, व्यवस्थापन, कुटुंब व समाज यांच्यावर अप्रत्यक्षदृष्ट्या परिणाम होत असतो. एखाद्या ठिकाणी अपघात झाला की दुर्घटनाग्रस्त कामगाराबरोबर काम करणाऱ्या कामगारांचे मनोधैर्य खचते त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. जर ती व्यक्ती कुशल असेल तर त्याच्या जागी कुशल कामगार मिळेलच असे नाही. अर्थात त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. हॉस्पीटलमध्ये घरातील प्रत्येक व्यक्तीची ये-जा होत असते त्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर होतो. अर्थात सर्व कुटुंब अप्रत्यक्षपणे आजारी होते. शेजाऱ्याची देखील धावपळ होते. यासाठी सोपा उपाय म्हणजे काम करताना स्वत:ला सांभाळा व स्वत:बरोबर दुसऱ्याला देखील सांभाळा.

**मनोगत**

आपल्या येथे एकाच प्रकारची उत्पादने करणारे विविध कारखाने आहेत. अशा कारखान्यामधील सुरक्षा समितीमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी एकमेकांच्या कारखान्यात जाऊन सुरक्षा व्यवस्थेचा अभ्यास करावा व सदर पध्दती आपल्या कारखान्यात अमलात आणता येतील का याचा विचार करावा. सुरक्षेबद्दल विचारंची व नियमांची देवाण घेवाण जर एकाच प्रकारचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांनी केले तर अपघाताचे प्रमाण नक्कीच कमी होण्यास मदत होईल.

असे दिसून येते की व्यवस्थापन व कामगार सुरक्षेबाबत आपला सहभाग दाखवत असले तरी सुरक्षेच्या विकासासाठी पूर्ण वेळ दिला जात नाही. मात्र उत्पादन व गुणवत्तेबरोबर सुरक्षेला देखील समांतर वेळ देणे जरुरीचे आहे. व्यवस्थापन व कामगार यांनी सुरक्षा अधिकाऱ्याला सुरक्षेशी निगडीत प्रत्येक कार्यात सहाय्य करणे आवश्यक आहे व सुरक्षेबद्दलची ओढ फक्त सुरक्षा दिन किंवा सुरक्षा सप्ताहापुरती मर्यादित न ठेवता, सतत जागृत ठेवणे आवश्यक आहे. व्यवस्थापन व कामगार यांच्या सुरक्षेकडे पहाण्याचा दृष्टीकोन जर निस्वार्थी असेल तर कारखाना सुरक्षित व समृध्द होऊ शकतो.



# Where there's energy, there's HP

**Powering marine engines, propelling airplanes, energizing industries, mechanizing agriculture, igniting stoves, lighting lanterns ... HP is synonymous with energy in India.**

For the last 30 years and more, Hindustan Petroleum has meant different things to different people. For some it represents an abundant supply of Petrol & Diesel. For others it stands for the easy availability of LPG and lubricants. Thousands of others see in it an inexhaustible reservoir of Kerosene and other petroleum products for meeting their energy needs. For all of them HP signifies an ever-radiant source of energy. Energy that is making a big difference to millions of lives. In the new millennium HP is all set to unveil an exciting new phase in its growth. Diversifying into Oil Exploration and Production, Power Generation, Renewable Energy ventures and much more. Confident of creating a future full of energy.



हिन्दुस्तान पेट्रोलियम

HP

*Future full of energy*

• PETROL • DIESEL • LPG • KEROSENE • AVIATION FUEL • NAPHTHA • FURNACE OIL • BITUMEN • LOW SULPHUR HEAVY STOCK • LUBES & GREASES • SOLVENTS • INDUSTRIAL SPECIALITIES

# GLOBAL WARMING.....contd

- A. A. RAICHUR

### YOU CAN HELP FIGHT GLOBAL WARMING

Many efforts are being made by various nations to cut down the rate of global warming. One such effort is the Kyoto agreement that has been made between various nations to reduce the emissions of various green house gases. Also many non profit organizations are working for the cause. Al Gore was one of the foremost U.S. politicians to heave an alarm about the hazards of global warming. He has produced a significantly acclaimed documentary movie called “An Inconvenient Truth,” and written a book that archives his advice that Earth is dashing toward an immensely warmer future. Al Gore, the former vice president of United States has given various speeches to raise an awareness of global warming. He has warned people about the ill effects of Global warming and its remedies.

But an interesting side of the global warming episode is that there are people who do not consider global warming as something that is creating a problem. Skeptics of global warming think that global warming is not an ecological trouble. According to the global warming skeptics, the recent enhancement in the earth’s average temperature is no reason for alarm. According to them earth’s coastlines and polar ice caps are not at a risk of vanishing. Global warming skeptics consider that the weather models used to establish global warming and to forecast its impacts are distorted. According to the models, if calculations are made the last few decades must have been much worse as compared to actually happened to be. Most of the global warming skeptics believe that the global warming is not actually occurring. They stress on the fact the climatic conditions vary because of volcanism, the obliquity cycle, changes in solar output, and internal variability. Also the warming can be due to the variation in cloud cover, which in turn is responsible for the temperatures on the earth.

The variations are also a result of cosmic ray flux that is modulated by the solar magnetic cycles.

### HOW GLOBAL WARMING AFFECT YOU

Global warming is caused by green house gases, which trap in the sun’s infrared rays in the earth’s atmosphere, which in turn heat up the earth’s atmosphere. These green house effect warming is called as global warming. The effects of green house effect are visible more prominently in the recent years, with number of natural calamities on the rise in the whole world.

The global warming has happened in the past few years and is evident from the rise in mean temperature of the earth’s atmosphere. The main causes for the global warming are attributed to release of green house gases by human activities. The main gases contributing to green house effect are carbon dioxide, water vapor, methane and nitrous oxide. The largest producers of these gases are the thermal power plants, which burn the fossil fuels and produce these gases in large quantities. The second biggest sources of these green house gases are the road vehicles and industries.

The global warming has led to increase in mean earth surface temperature and thus melting of polar ice. There are frequent melt down of glaciers that result in floods and other natural calamities. The melting of ice at the poles had led the mean sea level. And further increase in temperature may further melt the ice and lead to further increase in mean sea level, which will engulf low lying countries.

The effect of global warming is very evident on the animal kingdom also. Some animals have become extinct due to loss of their natural habitat or their inability to evolve to the rapid changes in the climate. Also there is a change in their life style because of the changes in the seasons. The migrating birds have changed their time of travel and also their place of migration.

The effect of global warming can be felt on seasons too. There is shift in season cycle, as the summers are getting longer than the winters. This has affected the animals and made them to change their lifestyle accordingly, and those who failed to do so have perished or on the verge of extinction.

The global warming is also responsible for the introduction of some new diseases. The bacteria are more effective and multiply much faster in warmer temperatures compared to cold temperatures. The increase in temperature has led to increase in the microbes that cause diseases.

Global warming is also effecting the crop production, as the crops are getting destroyed by the sudden change in temperatures or sudden on set of rains. Also the flash floods and other natural calamities affect the crop.

As a matter of fact, because of global warming, the earth’s atmosphere is getting more unpredictable with heavy rains in the areas, which have scanty rainfall or drought in the areas, which received good annual rainfall. The months of rainfall has also getting affected.

But there are some people on the other side of the wall also, they believe that the global warming is a natural process and cannot disturb our ecosystem. The earth’s surface mean temperature was even higher a long time ago, and the ecosystem has evolved from that temperature to this. So it can evolve further. But the changes that are happening now are rather fast compared to earlier times.





**First Choice for global services in**

- Api Machine Shop Services
- Fabrication Services
- Oilfield Rentals
- Premium Connection - Manufacturing Repairing & Redresses.

**ITS INDIA PVT. LTD.**

**KAKINADA:** Plot No 13 /A, Vakalapudi, Industrial Park, Kakinada, A.P. - 533005. Tel: 0884 2306365/66
Email : indiasales@its-energyservices.com
**MUMBAI :** 3rd Floor, Apeejay Express, Sector-17, Vashi, Navi Mumbai - 400703. Tel: 022 - 39152300

**www.its-energyservices.com**

We are committed to providing the highest quality service in all our chosen markets. **It's that simple.**

NUCLEAR SAFETY SPECIALIST

# SAFETY UMBRELLA

A Division of Safety Services, Mumbai

&

# SAFETY SERVICES

ALL BRANDED PPE'S UNDER ONE ROOF

Add: A/5, RAJNIKETAN BUILDING, OPP. MAHINDRA GARDEN, S.V.ROAD, GOREGAON (W), MUMBAI- 400 062
Tel : 022-2872 26 27 / 2876 45 42, Fax : 022-2872 48 31 Email Id: safetyumbrella@gmail.com / safetybom@vsnl.net
Web : www.dandsafety.com

## DISTRIBUTORSHIP OF THE FOLLOWING COMPANIES AND PRODUCTS:

**PIERCAN S.A.S.** (FRANCE):
ISOLATOR GLOVES & BOOTING (FOR INDIA)

**SPERIAN PROTECTION HONG KONG LTD. (HONG KONG)**
PERSONAL PROTECTIVE EQUIPMENTS

**RAE SYSTEMS (UAE):**
RADIATION DETECTION SOLUTION (FOR INDIA)

**NITREX Sdn bhd** (MALAYSIA):
HAND PROTECTION (FOR INDIA)

**AERO CLUB** (INDIA) :
MANUFACTURE OF WOODLAND SAFETY SHOES & CASUAL SHOES

**SPERIAN CLOTHING LTD.** (FORMERLY DELTA CLOTHING LTD.) (FRANCE)
(NUCLEAR RESPIRATORY & TAPES SPECIALIST) (FOR INDIA)

**BELLAIR** (FRANCE)
BREATHING AIR SOLUTIONS (FOR INDIA)



The 38th National Safety week was celebrated at Matunga Carriage Work shop by organizing various programs such as Safety pledge, safety quiz, safety questionnaire and safety lectures series. Shri Solanki, Executive Committee Member of NSC-MC, is delivering the lecture on safety at Matunga. The audience are being seen in picture. Shri M. M. Pande, A. R. Lahane and G. C. Gupta, safety officers are seen on dais on this occasion.





पर्यावरण रक्षणासंबंधी मार्गदर्शन करणाऱ्या माहितीपत्रकांचे वाटप... पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या बॅनर्सनी नटलेली पालिकेची वाहने... प्रसिद्ध पार्श्वगायक श्री सुदेश भोसले यांची उपस्थिती अशा वातावरणात मुंबई महानगरपलिकेने मुंबईकरांना पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

## ARTICLES & SUGGESTIONS

**Members are requested to forward their articles in Marathi, Hindi & English on the theme connected with health, safety and environment for publishing the same in the forthcoming issue of the NSC-MC newsletter, at least 30 days in advance of previous month of issue.**

## URGENTLY REQUIRED

**NSC-MC would like to appoint SAFETY ENGINEER (Trainee) with requisite qualification, suitable stipend will be provided. Application for same are invited by e-mail or by post on or before 31st July 2009 at our office address. E-mail: nscmc@mtnl.net.in**


**Advertise in 'Mahasurksha Patrika' and derive BIG benefits**

(Mahasuraksha Patrika reaches over 2000 members from all of life all over Maharashtra

**ADVERTISEMENT TARIFF**

| Position | Single Insertion | Position | Single Insertion |
|---|---|---|---|
| Full Page | Rs.5,000/- | Half Page | Rs.3,000/- |
| Quarter Page | Rs.1,500/- | | |

Note: Positive / artwork or CD accepted upto 15th day of previous month of issue.


## NSC-MC UNDERTAKES

**Safety Audits, Energy Conservation, Inhouse Training Programmes & other Safety related assignments.**

Please write to:
**The Hon. Secretary**
**NATIONAL SAFETY COUNCIL - MAHARASHTRA CHAPTER**
5/48, Tardeo A.C. Market Bldg., Tardeo Road, Mumbai - 400034.
Telefax: 022-2352 3042 Email: nscmc@mtnl.net.in


**EDITORIAL BOARD: Mr. D.L. Maskikar, Mr. A.A. Raichur, Mr. P.R. Masurkar, Mr. J.A. Solanki, Mr. M. Kant.** Price Rs.20/- Edited and Published by: D.L.Maskikar, Vice Chairman on behalf of National Safety Council-Maharashtra Chapter, 5/48, Tardeo A.C. Market Building, Tardeo Raod, Mumbai 400 034. Telefax: 022-2352 3042, Email: nscmc@mtnl.net.in and Printed by GOPALE TRADERS, 13/21, Mapla House, #15, Chana Street, Fort, Mumbai - 400 001. *The views expressed by the authors of the articles published are their own and NSC-MC does not assume any responsibility for the same.*